भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# ग्रामिण कृषि मौसम सेवा

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक - सिंधुदुर्ग
## कालावधी (दिनांक ०७.११.२०२० ते ११.११.२०२०)

अंक ८८/२०२० | दिनांक ०६.११.२०२० | कालावधी ५ दिवस

| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (३०/१०/२०२० ते ०५/११/२०२० पर्यंत) | | | | | | | हवामानाचे घटक | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पूर्वानुमान (वैधता ०७/११/२०२० ते ११/११/२०२० पर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३०/१० | ३१/१० | ०१/११ | ०२/११ | ०३/११ | ०४/११ | ०५/११ | दिनांक | ०७/११ | ०८/११ | ०९/११ | १०/११ | ११/११ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मि. मी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३४.० | ३४.० | ३६.० | ३५.० | ३६.० | ३६.० | ३५.० | कमाल तापमान (अं. से) | ३७ | ३६ | ३६ | ३६ | ३६ |
| २२.० | २२.० | २२.० | २२.० | २०.५ | २१.० | २०.० | किमान तापमान (अं. से) | १८ | १९ | १९ | १९ | १९ |
| निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | मेघाच्छादन (ऑक्टा.) सकाळ | ० | ० | १ | २ | ४ |
| निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | मेघाच्छादन (ऑक्टा.) दुपार | | | | | |
| ९५ | ९१ | ९८ | ९८ | ९१ | ९५ | ९१ | सकाळची सापेक्ष आर्द्रता(%) | ५९ | ७८ | ७६ | ६४ | ५७ |
| ५५ | ५१ | ५५ | ५१ | ४५ | ५० | ४२ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ३५ | ५२ | ५० | ३९ | ३२ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.१ | ०.० | वा-याचा वेग (कि.मी/तास) | ०११ | ००७ | ००९ | ०१० | ०११ |
| स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | वा-याची दिशा सकाळ | पुर्वोत्तर/ ईशान्ये कडे | पुर्वोत्तर/ ईशान्ये कडे | पुर्वोत्तर/ ईशान्ये कडे | पुर्वोत्तर/ ईशान्ये कडे | पुर्वोत्तर/ ईशान्ये कडे |
| स्थिर | स्थिर | स्थिर | पश्चिमोत्तर/ वायव्ये कडे | स्थिर | पश्चिमोत्तर/ वायव्ये कडे | पुर्वोत्तर/ ईशान्ये कडे | वा-याची दिशा दुपार | | | | | |

| मागील वर्षातील (२०१९) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०२० पासुनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०२० पासुनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ४५९१.० | ४८४०.४ | ४८३७.२ | ०.० |

| | |
|---|---|
| पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती | सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये पुढील पाच दिवसामध्ये दिनांक ०७ ते ११ नोव्हेंबर, २०२० या कालावधी दरम्यान पर्जन्यमान कोरडे राहण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर तापमानात ब-याच अंशी वाढ होऊन हवामान कोरडे व निरभ्र राहण्याची शक्यता आहे. असा अंदाज प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांच्याकडून वर्तविण्यात आला आहे. |
| इशारा | सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये पुढील पाच दिवसासाठी प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांच्या कडून पर्जन्यासंबधी कोणताही ईशारा देण्यात आलेला नाही. |
| विस्तारीत श्रेणीतील हवामानाचा अंदाज | विस्तारीत श्रेणीतील हवामानाच्या अंदाजानुसार कोकण विभागामध्ये पुढील दोन आठवड्यामध्ये पर्जन्यमान सरासरीपेक्षा कमी राहुन कमाल व किमान तापमानही सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे. |
| सर्वसाधारण कृषि सल्ला | रबी हंगामात वांगी, मिरची, कोबी, नवलकोल इ. भाजीपाल्याची लागवड करण्यासाठी रोपवाटीका तयार करण्याची पूर्वतयारी करण्यास सुरुवात करावी. भाजीपाल्याची रोपे गादीवाफयावर तयार करावीत. यासाठी लागणारे दर्जेदार बियाणे वेळीच मिळवावे. |
| संक्षिप्त संदेश सल्ला | आंबा पालवीवर तुडतुडे व मिजमाशीपासुन संरक्षणासाठी ३६%ईसी मोनोक्रोटोफॉस ११मिली/१० लिटर पाण्यातुन फवारावे. |

## हवामान अंदाजावर आधारीत कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात | हळव्या जातीः- कापणी<br>निम गरव्या व गरव्या जातीः- कापणी | हळव्या व निम गरव्या भाताची कापणी झालेल्या ठिकाणी अंगओलीतामुळे भाताच्या खोडव्यास फुटवे येत असुन जमिनीतील अन्नद्रव्यांचा वायपट -हास टाळण्यासाठी अश्या ठिकाणी मशागत करुन भाताचे खोडवे नाहीसे करावे.<br>भात पिक काढणीस तयार झाले आहे त्याठिकाणचे भात पिक सकाळ ते दुपार या वेळेत जमिनीलगत कापुन घ्यावे.<br>कापणी केलेल्या भात पिकाची लागोलाग मळणी/झोडणी करुन धान्य कोरड्या आणि सुरक्षित ठिकाणी वाळवण्यास ठेवावेत.<br>भात कापणीसाठी विद्यापीठाने विकसीत केलेल्या वैभव विळ्याचा वापर करावा जेणेकरुन भात जमिनीलगत कापले जाईल.<br>भात पिकाची मळणी/झोडणी केल्यानंतर पिकाच्या पेंढ्या सुरक्षित ठिकाणी ठेवण्याची व्यवस्था करावी. जेणेकरुन त्या पेंढ्या पावसात भिजणार नाहीत व जनावरांस चांगल्या चा-याची उपलब्धता होईल. |
| नागली (नाचणी) | कापणी | नागली पिक काढणीस तयार झाले आहे त्याठिकाणी नागली पिकाच्या लोंब्या सकाळ ते दुपार या वेळेत विळ्याच्या सहाय्याने कापुन घ्याव्यात. कापणी केलेल्या नागली पिकाची लागोलाग मळणी करुन धान्य कोरड्या आणि सुरक्षित ठिकाणी वाळवण्यास ठेवावेत. |
| भुईमुग | रब्बी पेरणी | रब्बी उन्हाळी भुईमुग लागवडीसाठी शेताच्या पुर्वतयारीची कामे हाती घ्यावी. जमिन खोल नांगरुन, ढेकळे फोडुन व हेक्टरी १० ते १५ टन चांगले कुजलेले शेणखत/कंपोस्ट मिसळुन तयार करावी. पेरणीसाठी टी.जी.२६, टी.ए.जी.२४, टी.पी.जी.४१, कोकण गौरव, कोकण टपोरा या जातींचे बियाणे हेक्टरी १२५ ते १५० किलो या प्रमाणात वापरावे.<br>पुढील ५ दिवसांमध्ये पर्जन्यमान कोरडे राहण्याची शक्यता लक्षात घेता खरीप भुईमुगाची काढणी ऊरकुन घ्यावी.<br>खरीप भुईमुग पीक तयार होण्याच्या अवस्थेत आहे. साधारणपणे भुईमुगाची काढणी करताना शेंगेवरच्या शिरा ठळक दिसतात. शेंग दाबल्यावर टणक लागते, टरफल आतल्या बाजूने काळसर होते. तसेच दाण्याच्या रंगात बदल होतो. रोपांवरील कमीत कमी ८० टक्के शेंगा तयार झाल्यावर भुईमुगाच्या काढणीस सुरुवात करावी व शेंगा स्वच्छ धुवून चांगल्या प्रकारे वाळवाव्यात. |
| सुर्यफुल | रब्बी पेरणी | रबी सुर्यफुल लागवडीसाठी जमिन उभी-आडवी खोल नांगरुन भुसभुशीत करावी. शेवटच्या कुळवणीपुर्वी हेक्टर १० ते टन चांगले कुजलेले शेणखत/कंपोस्ट जमिनीवर पसरुन मातीत मिसळावे. पेरणीसाठी. पेरणीसाठी सुर्यफुलाच्या मॉर्डन, एस.एस.५६, बी.एस.एच-१ इ. सुधारीत जातींचा वापर करावा. हेक्टरी १० ते १२ किलो बियाणे वापरावे. पेरणीपुर्वी बियाणे १२ तास पाण्यात भिजवुन नंतर सावलीत वाळवावे. तसेच प्रती किलो २ ग्रम या प्रमाणात बुरशीनाशक चोळावे. |
| मोहोरी | रब्बी पेरणी | मोहरी पिकाच्या पेरणीसाठी हवामान योग्य असल्याने पुसा बोल्ड किंवा वरुणा या जातीची लागवड करावी. पिकाची पेरणी ४५ x १० से.मी अंतरावर ३ ते ४ से.मी. खोल करावी. पेरणीपुर्वी प्रती गुंठ्यास १ किलो युरिया आणि ३ किलो सिंगल सुपर फॉस्फेट ओळीत पेरुन |

| | | |
|---|---|---|
| | | द्यावे. |
| कुळीथ | पेरणी | रब्बी हंगामातील कुळीथ पिकाची पेरणी १५ ऑक्टोबर ते नोव्हेंबर अखेर पर्यंत करावी.<br>कुळीथाच्या पेरणीसाठी दापोली - १ या पिकाच्या सुधारीत जातींचा वापर करावा.<br>कुळीथ पिकाची पेरणी ३०x१५ सेमी या अंतरावर करावी. साधारणतः कुळीथासाठी प्रती हेक्टरी १८ ते २० किलो बियाणे पुरते, बियाण्यास प्रती किलोस २.५ ग्रम थायरम या बुरशीनाशकाची व नंतर २५ ग्रम रायझोबीयम या जीवाणु संवर्धकाची बीज प्रक्रिया करावी. कुळीथासाठी २५ किलो नत्र, ५० किलो स्फुरद आणि ६० किलो पालाश या अन्नद्रव्याची मात्रा ओळीत सरीमध्ये बुजवुन द्यावी. |
| चवळी | पेरणी | रब्बी हंगामातील चवळी पिकाची पेरणी १५ ऑक्टोबर ते नोव्हेंबर अखेर पर्यंत करावी.<br>चवळी पिकाच्या पेरणीसाठी कोकण सदाबहार, कोकण सफेद या सुधारीत जातींचा वापर करावा.<br>चवळी पिकाची पेरणी ३०x१५ सेमी या अंतरावर करावी. साधारणतः चवळीसाठी प्रती हेक्टरी १५ ते १८ किलो बियाणे पुरते, बियाण्यास प्रती किलोस २.५ ग्रम थायरम या बुरशीनाशकाची व नंतर २५ ग्रम रायझोबीयम या जीवाणु संवर्धकाची बीज प्रक्रिया करावी. चवळीसाठी २५ किलो नत्र आणि ५० किलो स्फुरद या अन्नद्रव्याची मात्रा ओळीत सरीमध्ये बुजवुन द्यावी. |
| कडवा वाल | पेरणी | पिकाची पेरणी ऑक्टोबर व नोव्हेंबर मध्ये ३०x१५ सेमी किंवा ३०x२० सेमी किंवा ३०x३० सेमी या अंतरावर नांगरा पाठोपाठ करावी.<br>पेरणीसाठी पिकाच्या कोकण वाल -१ व कोकण वाल -२ या सुधारीत जातींचा वापर करावा.<br>पाभरीणे पेरणी केल्यास साधारणतः प्रती हेक्टरी ५० ते ६० किलो बियाणे पुरते. बियाण्यास प्रती किलोस ३.० ग्रम थायरम या बुरशीनाशकाची व नंतर २५ ग्रम रायझोबीयम या जीवाणु संवर्धकाची बीज प्रक्रिया करावी.<br>पिकास ५० किलो स्फुरद या अन्नद्रव्याची मात्रा ओळीत बियाण्याखाली साधारण ५ सेमी खोलीवर द्यावी. |
| आंबा | नवीन पालवी | नवीन आंबा लागवडीमध्ये कलमांचे ऊष्णतेपासुन संरक्षण करण्यासाठी शेडनेटचे आच्छादन करावे.<br>मोठया आंबा बागेमध्ये वाढलेले झाडे झुडपे व तण काढून बागेची स्वच्छता करून घ्यावी.<br>पॅक्लोब्युट्राझॉल (कल्टार) दिलेल्या झाडांचे बुंधे व त्याभोवतालचा भाग बेणणी करुन अथवा ग्रामोक्झोन हे तणनाशक फवारुन तणविरहीत ठेवावेत.<br>आंब्यामध्ये नवीन पालवी आली असल्यास त्या पालवीचे शेंडा पोखरणारी अळी, पाने पोखरणाारी अळी, आणि पाने खरवडणारा भुंगा या कीडींपासून अवश्यकतेनुसार संरक्षण करावे. त्यासाठी २५ टक्के प्रवाही डायमिथोएट १२ मिली किंवा ३६ टक्के प्रवाही मानोक्रोटोफॉस ११ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघडीप पाहून फवारणी करावी. |
| काजु | नवीन पालवी | नवीन काजु लागवडीमध्ये कलमांचे ऊष्णतेपासुन संरक्षण करण्यासाठी शेडनेटचे आच्छादन करावे.<br>मोठया काजू बागेमध्ये वाढलेले झाडे झुडपे व तण काढून बागेची स्वच्छता करून घ्यावी.<br>काजूच्या पूर्ण वाढलेल्या 5 वर्षाच्या व त्यावरील वयाच्या झाडावर 10 पी.पी.एम. इथ्रेल या संजिवकाची पहिली फवारणी पालवी आल्यावर करावी.<br>जिल्ह्यामध्ये काजु बागांना नविन पालवी येत असुन तापमानातील वाढ तसेच कोरड्या वातावरणामुळे काजु बागायतदारांनी ढेकण्या किडीच्या प्रादुर्भाव होवू नये म्हणुन जागरुक रहावे, प्रादुर्भाव आढ़ळुन आल्यास नियंत्रणासाठी प्रवाही मोनोक्रोटोफॉस ३६% १५ मि.ली. किंवा लम्बडा सायहॅलोथ्रिन ५% ६ मि.ली. १० लिटर पाण्यातुन फवारावे.<br>काजुवर खोड्किडा (रोठा) या किडिचा प्रादुर्भाव आढ़ळुन आल्यास १५ मि.मी. पटाशिच्या सहाय्याने प्रादुर्भित साल काढून झाडातील रोठ्याला बाहेर काढून मारुन टाकावे व तो भाग ५% प्रवाही फिप्रोनील २ मी. लि. प्रति १ लिटर पाण्यामध्ये मिसळून चांगला भिजवावा. फवारणीच्यावेळी किटकनाशक/बुरशीनाशक द्रावणामध्ये स्टीकर सारखा चिकट पदार्थ 1 मिली/1 लि. पाणी याप्रमाणात मिसळावा. |
| नारळ | फळ विकास | नारळावरील गेंड्या भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी प्रादुर्भावग्रस्त माड साफ करून सर्वात वरील पानांच्या बेचक्यात 2 टक्के मिथील पॅराथिऑन पावडर ५० ग्रॅम + ५० ग्रॅम वाळू यांचे समप्रमाणात मिश्रण करून भरावे. बागेमध्ये शेणखताच्या खड्डयात अळयांना मारण्यासाठी ५० टक्के पा.मि. कार्बारिल भुकटी ४० ग्रॅम प्रति १० लि. पाण्यात मिसळून फवारावी. |
| कलिंगड | फळ धारणा | कलींगड पीकाच्या लागवडीसाठी शुगरबेबी या जातीचे खात्रीशीर बियाणे मिळवून सरी पदधतीने 4 x 1 मि. अतंरावर सरीच्या दोन्ही बाजूस टोकणी करावी. बीयाण्यास थायरम हे बुरशीनाशक 3 ग्रॅम/किलो बियाणे या प्रमाणात चोळावे. |
| माती परिक्षण | - | जमिनीतील नत्र, स्फुरद व पालाशचे प्रमाण तपासण्यासाठी खरीप पीकाची काढणी केल्यानंतर लगेचच मातीचा नमुना घ्यावा व तपासणीसाठी जवळच्या माती परिक्षण प्रयोगशाळेकडे पाठवावा. मातीचा नमुना कसा घ्यावा याबाबत अधिक माहितासाठी मृद शास्त्रज्ञ, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले यांचेकडे संपर्क साधावा (दुरध्वनी क्र. 02366-262234) |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील "ग्रामीण कृषि मौसम सेवा" योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.


डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर
सहयोगी अधिष्ठाता तथा नोडल ऑफिसर
कृषी हवामानशास्त्रीय क्षेत्र एकक
ग्रामिण कृषि मौसम सेवा
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
०२३६२-२४४२३१

डॉ. यशवंत चं. मुठाळ
तांत्रिक अधिकारी
कृषी हवामानशास्त्रीय क्षेत्र एकक
ग्रामिण कृषि मौसम सेवा
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
०२३६२-२४४२३१